**नमस्कार गिरिमित्रांनो,**

अज्ञाताचा शोध घेण्याची माणसाची प्रेरणा जितकी आदिम, तितकीच साहसाची ओढ देखील. याच साहसातून त्यांने डोंगर ओलांडले, महासागर पार केले आणि आकाशालादेखील गवसणी घातली. निसर्गाचा मान राखत त्याच्या अंगाखांद्यावर खेळताना त्याने स्वतःला आजमावलं. शारीरक-मानसिक क्षमतेचा कस लावणाऱ्या गिर्यारोहणासारख्या एका अफाट साहसी खेळाला जन्माला घातलं. आपल्या साऱ्याच क्षमतांचा कस तर येथे कायमच लागतो. सहजसाध्य असं काहीच नाही. पण त्यातदेखील जाणीवपूर्वक एखादं नवं आव्हान स्वीकारण्याची खुमखुमी आपल्यात असते. मग एखादा डोंगरवेडा हिमशिखरावर एकट्याने जातो, तर कोणी अतिउंचावरील हिमशिखरावर कृत्रिम प्राणवायूच्या गरजेवर मात करतो, तर एखादा चक्क कृत्रिम पायांच्या जोरावर हिमशिखरांना गवसणी घालतो, एखादा अत्यंत वेगाने एखादा कडा येंगून जातो, कोणी महिनोंमहिने पाठीवर सामान लादून डोंगर भटकू लागतो. एक ना दोन. आपली घुमक्कड मंडळी सतत असं काही ना काही करतच असतात. अर्थातच हे करताना त्यातील धोक्यांची जाणीव ठेवत मोजूनमापून घेतलेली जोखीमच असते ती. कॅलक्युलेटेड रिस्क. कोणाची जोखीम कमी, कोणाची खूपच अधिक. साहसाची सीमा प्रत्येकाने ठरवून घेतलेली. पण कधी कधी आपण साहसाची परिसीमादेखील गाठतो. अगदी ठरवून. ही साहसाची परिसीमाच तुम्हाला एका अत्युच्च आनंदाला पोहचवते. डोंगरभटक्यांचं सारं आयुष्य व्यापून उरते. धोका, साहस आणि आनंद अशी साखळी आणखीनच दृढ होत जाते. म्हणूनच १६ व्या गिरिमित्र संमेलनाची मध्यवर्ती संकल्पना **'साहसाची परिसीमा'** असणार आहे.

विशेष आनंदाची बाब म्हणजे साहसाची परिसीमा गाठणारी गिर्यारोहक गेरलिन्ड कल्टेनब्रुनर यावर्षीच्या संमेलनाच्या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहे. कल्टेनब्रुनर हिने आठ हजार मीटरपेक्षा अधिक उंचीच्या सर्व १४ शिखरांवर यशस्वीरित्या आरोहण केले आहे. विशेष म्हणजे ही सर्व आरोहणं कृत्रिम प्राणवायूशिवाय आणि अतिउंचावरील भारवाहकांच्या मदतीशिवाय करण्यात आली आहेत. संमेलनात त्यांच्या मोहिमांचे विशेष सादरीकरण तर असेलच, पण डोंगरभटक्यांना त्यांच्याशी संवाददेखील साधता येईल.

गिरिमित्र संमेलन

## १६ व्या गिरिमित्र संमेलनाची सर्वसाधारण रुपरेषा

**दिनांक : ०८ जुलै २०१७ - सायंकाळी : ५.०० ते ९.००**

- दृक्श्राव्य सादरीकरण स्पर्धेतील निवडक सादरीकरणे.
- मुलाखत - मुख्य अतिथी गेरलिन्ड कल्टेनब्रुनर.

**दिनांक : ०९ जुलै २०१७ - सकाळी : ९.०० ते सायंकाळी ६.००**

- गिरिमित्र सन्मान प्रदान सोहळा.
- विशेष सादरीकरण - मुख्य अतिथी गेरलिन्ड कल्टेनब्रुनर.
- मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित विशेष कार्यक्रम.
- विशेष सादरीकरण - 'वॉकिंग ऑन द एज'
- दृक्श्राव्य सादरीकरणातील पारितोषकप्राप्त सादरीकरणे.
- दुर्गसंवर्धन आणि शासकीय यंत्रणा - डॉ. तेजस गर्गे
- पोस्टर आणि छायाचित्र स्पर्धा निवडक कलाकृती प्रदर्शन.
- ट्रेकर ब्लॉगर्स, छायाचित्रण, पोस्टर स्पर्धा पारितोषक वितरण
- अभ्यासपूर्ण दृक्श्राव्य सादरीकरण.
- प्रश्नमंजुषा.



- मुंबई बाहेरील प्रतिनिधींची ०८ जुलै२०१७ रोजी राहण्याची व्यवस्था महाराष्ट्र सेवा संघ मुलुंड येथे करण्यात आली आहे. त्यासाठी पूर्वसूचना देणे आवश्यक आहे.
- संमेलनाच्या निमित्ताने घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा सर्वांसाठी खुल्या आहेत. छायाचित्र स्पर्धा, दृक्श्राव्य सादरीकरण स्पर्धा, अभ्यासपूर्ण सादरीकरण आदी स्पर्धांमधील पुरस्कारप्राप्त सहभागींना पुरस्कार स्वीकारण्यापुरता संमेलनात प्रवेश मिळेल. त्याव्यतिरिक्त त्यांना संमेलनात पूर्ण वेळ सहभागी व्हायचे असेल तर संपूर्ण देणगी प्रवेशिका घ्यावी लागेल.
- संमेलनाच्या साप्ताहिक बैठका दर बुधवारी महाराष्ट्र सेवा संघ मुलुंड येथे होत असतात. आपण देखील या बैठकांना उपस्थित राहू शकता. आपल्या काही सूचना, नवे विषय असतील तर आम्हास जरुर कळवावे.
- संमेलन प्रवेशिका देणगी मूल्य रु. ६००/- फक्त<br>(दिनांक ८ जुलै चहा, भोजन, दिनांक ९ जुलै चहा, नाष्टा, भोजन)
- संमेलनात सहभागी होण्यासाठी पूर्वनोंदणी आवश्यक आहे. संमेलनस्थळी केवळ ५०० डोंगरभटक्यांना सामावून घेऊ शकतो. संमेलन प्रवेशिका वितरणात प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य राहील.
- १६ व्या गिरिमित्र संमेलनाचे आयोजन युथ होस्टेल महाराष्ट्र राज्य शाखेमार्फत करण्यात येत आहे. तसेच अनेक गिर्यारोहण संस्थांचे नेहमीप्रमाणे आयोजनात सहकार्य आहेच.
- संमेलनाच्या निमित्ताने घेण्यात येणाऱ्या पोस्टर स्पर्धा, छायाचित्र स्पर्धा, दृक्श्राव्य सादरीकरण स्पर्धा, अभ्यासपूर्ण सादरीकरण स्पर्धा, ट्रेकर ब्लॉगर स्पर्धा या विषयी अधिक माहितीसाठी कृपया पाहणे -<br>www.girimitra.org

या पत्रकाद्वारे आम्ही आपणास १६ व्या गिरिमित्र संमेलनात सहभागी होण्यासाठी आमंत्रित करीत आहोत. संमेलनाचे आयोजन व स्पर्धांमध्ये आपला सक्रिय सहभाग अपेक्षित आहे.

आपली उपस्थिती, सहकार्य अन् सहभाग यांच्या अपेक्षेसह...

**मुकेश मैसेरी**<br>संमेलन प्रमुख

**चंद्रशेखर वझे,**<br>अध्यक्ष महाराष्ट्र सेवा संघ मुलुंड

## संमेलन प्रवेशिका मिळण्याचे ठिकाण :

**महाराष्ट्र सेवा संघ**<br>जवाहरलाल नेहरू मार्ग अपना बाजारच्यावर,<br>मुलुंड (प), मुंबई ४०००८०<br>दूरध्वनी : ०२२ -२५६८१६३१<br>सोमवार ते शनिवारः सकाळी १०.३० ते सायंकाळी ७.३०,<br>रविवारः सकाळी १०.३० ते १२.३०<br>(साप्ताहिक सुट्टी - गुरुवार)<br>**ऑनलाइन बुकिंगसाठी** - www.girimitra.org

